D:\[illegible]-2004\july\[illegible]-11\letter61/007/

अवैध दारु विक्री संदर्भात महिलांची
तक्रार प्राप्त झाल्यास विशेष
पथकाद्वारे धाड टाकण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्रमांक सीआरएम २००४/६०८/पोल-११,
मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ५ जुलै, २००४

परिपत्रक

राज्यात आढळून येणाऱ्या अवैध दारु धंद्यावर वेळोवेळी धाडी टाकून अशी ठिकाणे नष्ट करण्याच्या तसेच पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या गावांत/ ठिकाणी अवैध धंदे आढळतील त्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत. तथापि अश्याप्रकारचे अवैध धंदे अद्यापी राज्यात चालू असल्याच्या तक्रारी करण्यात येत आहेत. यावरुन अवैध दारुच्या संदर्भात देण्यात आलेल्या सूचनांची अद्यापी काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते.

२. राज्यातील अवैध दारु विक्री संदर्भात संबंधित पोलीस स्टेशनमार्फत तत्परतेने दखल घेऊन योग्य कार्यवाही होत नाही. राज्यातील अवैध दारु विक्री संदर्भात कठोर उपाययोजना करण्याचा शासनाचा मानस असल्याने, याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी तत्परतेने कार्यवाही करावी. विशेषत: अवैध दारु विक्री संदर्भात महिलांची तक्रार पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्यास विशेष पथकाद्वारे सदर ठिकाणी धाड टाकण्यात यावी.

३. सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील अधिकाऱ्यांना अवैध दारुबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सक्त सूचना देण्यात याव्यात व याबाबत कुचराई केल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ना.रा. शेरे)
उपसचिव, गृह विभाग

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
३) जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)